# RTI Article on Editorial page of Maharashtra Times



# ही जबाबदारी घ्यावीच लागेल!

शैलेश गांधी

आरटीआय या संबोधनाने लोकांपर्यंत पोहोचलेल्या या कायद्याने काय साध्य केलेय? तर त्याचे स्वरूप देशव्यापी बनलेय, देशात असा एकही जिल्हा नसेल, की जेथे आरटीआयखाली अर्ज आलेले नाहीत. या कायद्याने अनेक खासगी प्रश्न सोडवायला मदत केली आहे आणि काही महाकाय भ्रष्टाचारांचा पर्दाफाशही केला आहे. देशातील सर्वसामान्य नागरिकाला सरकार आणि प्रशासन यांच्याकडून व्यक्ती म्हणून आपला सन्मान मिळवण्यास सक्षम बनविले आहे. ते सरकारच्या कारभारावर सन्मानपूर्वक देखरेख ठेवत आहेत. यावर्षी आरटीआय अर्जांची संख्या ८० लाखांच्या वर जाण्याची शक्यता आहे आणि हा कायदा अंमलात आल्यापासून आतापर्यंत आलेल्या अर्जांची संख्या तीन ते चार कोटींपर्यंत जाईल. नागरिकांनीच पुढाकार घेतल्यामुळे आरटीआयचा प्रसार आणि वाढही होत आहे. येत्या दशकात सरकार कायद्याच्या कलम ४नुसार बंधनकारक असलेली सुओ मोटो प्रकटीकरणे (डिस्क्लोजर्स) करून अंमलबजावणीत आणखी सुधार झाल्याचे आपल्याला दिसेल.

मात्र असे असले, तरी आरटीआयवर प्रतिकूल परिणाम करू शकणाऱ्या मुख्य धोक्यांकडेही पाहणे गरजेचे आहे. सत्तेत असलेल्या बहुतेकांची आरटीआयबाबत नापसंती आहे. प्रत्येकाच्या ओठी पारदर्शी कारभार हवा असे असते खरे, पण जेव्हा ते त्यांच्या कृत्याला लागू होते, तेव्हा मात्र माहिती उघड करण्यास टाळाटाळ करण्याकडेच कल असतो. आपल्या चुका उघड होतील आणि कामात अडथळे येतील असेच त्यांना मनापासून वाटत असते. भष्टाचारी व्यक्तीला ते नकोच असते. ही लोकशाही आहे आणि इथे प्रत्येक व्यक्ती ही बादशहा आणि बेगम आहे हे ते विसरतात. संसद असो की नोकरशाही की न्यायालये..या सर्वांतील अधिकारपदांना 'आम्ही या देशाचे नागरिक'(वुई द पीपल) यामुळेच वैधता प्राप्त होत असते. अगदी सुरुवातीच्या वर्षांत सार्वजनिक माहिती अधिकारी वैयक्तिक शिक्षा होण्याच्या भीतीने बऱ्यापैकी माहिती देत असत. पण आता त्यांचा पवित्रा ताठर झालेला दिसतो. माहिती नाकारण्याची नवनवी तंत्रे विकसित झाली आहेत आणि त्याद्वारे ते अर्जदाराला झटकून टाकतात. माहिती आयुक्त आणि न्यायालयांच्या निर्णयांनीही याला हातभार लावला आहे.

दुसरी अस्वस्थ करणारी बाब म्हणजे पारदर्शी कारभाराबाबत असलेला न्यायालयांचा दृष्टिकोन. आरटीआय कायदा होण्याच्या आधीपासून राज्य घटनेच्या कलम १९(१)(अ)नुसार माहिती मिळवणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असल्याचे अनेक खटल्यांच्या निकालात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मात्र गेल्या सात वर्षांत विविध न्यायालयांनी माहिती नाकारण्यासाठीची कारणे व पार्श्वभूमी यांचा विस्तार केल्याचे दिसते. सदर लेखकाने सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या १८ निकालांचा अभ्यास केला असता त्याला असे आढळले की यापैकी फक्त दोनच निकाल माहिती देण्याच्या बाजूचे होते. पैकी एका निकालात असे प्रतिपादन होते, की 'माहिती मिळवण्याच्या कृतीचा राष्ट्रीय विकासाच्या अथवा एकात्मतेच्या, नागरिकांत शांतता प्रस्थापित करण्याच्या कार्यात अडथळा होईल, किंवा शांततेचा भंग होईल अशा तऱ्हेने गैरवापर अथवा चुकीचा वापर होता कामा नये. तसेच आपले कर्तव्य बजावणाऱ्या प्रामाणिक अधिकाऱ्यांचा छळ करणारे हत्यार म्हणूनही त्याचा वापर होता कामा नये.' आपल्या नागरिकांनी अशा प्रकारे आपल्या मूलभूत अधिकारांचा गैरवापर केल्याचा पुरावा खरे तर आजवर समोर आलेला नाही. आरटीआय कायद्याच्या कलम १९(२)मध्ये ज्या सवलती आहेत त्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या पायमल्लीसंदर्भात आहेत. मात्र न्यायालयांचे अनेक निर्णय हे राज्यघटना, कायदा आणि नागरिकाच्या माहितीच्या अधिकाराशी विसंगत अशा सवलती देणारे आहेत.

> माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीला एक तप, म्हणजे बारा वर्षे पूर्ण होत असताना त्याच्या आतापर्यंतच्या महत्वाच्या उपलब्धींविषयी तसेच त्याला असलेल्या धोक्यांविषयीही काही बोलणे गरजेचे आहे.

आरटीआय कायद्याचा अन्वयार्थ लावणे आणि माहिती अधिकाराचे संरक्षण करणे या कामासाठी माहिती आयुक्त हे पद अस्तित्वात आले. पण ठिकठिकाणच्या माहिती आयुक्तांची कामगिरी असमाधानकारक असल्याचे दिसते. वेळेवर प्रतिसाद देण्याच्या कायद्यातील तरतुदीबाबत ते फारसे उत्साही नाहीत. त्यांनी ६० ते ९० दिवसांत त्यांचा निर्णय देणे अपेक्षित आहे, परंतु प्रत्यक्षात कित्येकदा त्यासाठी पूर्ण वर्ष लागते. त्यांची स्वत:ची पारदर्शकता आणि सचोटी सुमार असते. केंद्रीय माहिती आयोग तर आपल्याकडील प्रलंबित प्रकरणांपैकी ४० टक्क्यांहून अधिक अर्ज तांत्रिक कारणे देत नामंजूर करून टाकतात. कायदा दंतविहीन करत शिक्षेची तरतूद असलेली कलमे फारच कमी वेळा वापरली जातात. आयुक्तांच्या निवडीत पारदर्शकता असावी, आयोगाचे काम पारदर्शीपणे आणि सचोटीने चालावे यासाठीची पक्रिया टप्प्याने विकसित करत नेणे हा यावरील उपाय ठरू शकेल. माहिती आयुक्तांची विहीत कालमर्यादेत नेमणूक न करणे ही महाराष्ट्राची अतिरिक्त समस्या आहे. कायद्यानुसार जिथे ११ माहिती आयुक्त नेमण्याची गरज आहे, तिथे आपल्याकडे माहिती आयुक्तांची फक्त ७ पदे भरली गेली आहेत. राज्याला प्रमुख माहिती आयुक्तच नाही आणि पुणे, औरंगाबाद, नाशिक आणि अमरावती येथे ७ हजारांहून अधिक प्रकरणे सुनावणीसाठी प्रलंबित आहेत. याचा अर्थ या प्रकरणांवर निर्णय देण्यासाठी किमान १८ महिने लागू शकतात. सरासर दुर्लक्ष आणि कामाची पद्धत याद्वारे सरकारच नागरिकांच्या या कायद्याची कोंडी करत आहे. राज्य सरकारने तातडीने माहिती आयुक्तांची ११ पदे भरायला हवीत.

सर्वसामान्य नागरिकाला सन्मान देणारी आणि सुशासनाकडे नेणारी खरी लोकशाही निर्माण होऊन वैभवशाली भविष्याकडे वाटचाल करण्याची शक्यता या कायद्याच्या अंमलबजावणीत आहे. नागरिकांनी आरटीआयचा वापर आणि त्यातील चैतन्य कायम राखण्याचा अटोकाट प्रयत्न करायला हवा. तसेच कायद्याची अंमलबजावणी करताना तोंड द्याव्या लागणाऱ्या धोक्यांशी सामना करण्यासाठी आपली ऊर्जा वापरायला हवी. जर नागरिकांना उज्वल भविष्य आणि राष्ट्रासाठी सुशासन व लोकमान्य टिळकांच्या स्वप्नातील स्वराज्य मिळवणे अपेक्षित असेल, तर त्यांना ही जबाबदारी घ्यावीच लागेल.

*(लेखक माजी केंद्रीय माहिती आयुक्त आहेत.)*